# कुलगुरू तथा निवडणुक अपीलीय अधिकारी
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**(महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुका-२०२२)**

**(दहा नोंदणीकृत पदवीधर अधिसभेकरीता – कलम २८(२)(न) महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ प्रमाणे)**

महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांकरीता एकरुप परिनियम क्र.१/२०१७ मधील तरतुदींप्रमाणे विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांची प्रक्रीया सुरु आहे. यापैकी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्यांकरीता नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात आले होते. सदर नामनिर्देशन पत्रांपैकी ज्यांचे नामनिर्देशन पत्रे निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी अवैध ठरविण्यात आली आहेत, त्यांनी विहीत मुदतीत नाराजीने या कार्यालयात अपील दाखल केले आहेत. सदर अपीलांची पुर्वसुचीत सुनावणी दिनांक ०९.११.२०२२ रोजी घेण्यात आली. तसेच श्री. महेश उबाळे यांच्यासंदर्भात दि. १०-११-२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलकर्ते व त्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष हजर होते. अपीलार्थीनी त्यांच्या अपीलाच्या पुष्ठ्यार्थ अनेक मुद्दे मांडले. अंतीमतः सदर अपीलातील मुद्दे व निवडणुक निर्णय अधिकारी यांनी सादर केलेले अभिलेख यांचे मी बारकाईने वाचन केले.

करीता मी डॉ. प्रमोद येवले, कुलगुरू तथा निवडणुक अपीलीय अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ, महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व एकरुप परिनियम क्रं.१/२०१७ मधील तरतुदी मधील प्राप्त अधिकारांन्वये सुनावणी झालेल्या सर्व अपीलांवर खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

| अ. क्रं. | अपील क्रमांक | अपीलार्थीचे नाव | अपीलातील निर्णय |
|---|---|---|---|
| १ | १/२०२२ | शिंदे मिनाक्षी प्रल्हादराव | अपीलार्थी शिंदे मिनाक्षी प्रल्हादराव सुनावणीस स्वतः प्रतिनिधीसह उपस्थित आहेत. अपीलार्थीनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. परंतु सदर नामनिर्देशन पत्र भरतांना त्यांचा समावेश कलम २८(२) मध्ये होतो अथवा नाही याबाबत माहिती भरलेली / दिलेली नाही आणि त्यामुळे निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी ते नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे. याबाबत अपीलार्थी व त्यांचे प्रतिनिधी यांनी सदर बाब स्वीकारली व पुढे सदर बाब तांत्रीक समजुन त्यांच्या नामनिर्देशन पत्राचा सहानुभुतीपर्वक विचार करावा अशी विनंती करुन अपील मंजूर करावे म्हणुन नमुद केले. याशिवाय त्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट याचीका क्रं.६४७४/२००९ (यादवराव भिमराव सुर्यवंशी विरुद्ध महाराष्ट्र राज्य निवडणुक आयुक्त) प्रकरणातील दिनांक ०१.१०.२००९ रोजी पारीत केलेले निर्णय अभिलेखावर सादर केले व सदर निर्णयातील गुणोत्तरानुसार (ratio) अपीलार्थीने नामनिर्देशन पत्र भरतांना राहिलेल्या त्रुटी दुर करण्याची संधी द्यावी व झालेल्या चुका दुरुस्त करण्याची परवानगी देऊन त्यांचे नामनिर्देशन पत्र वैध करण्याची विनंती केली.<br>याबाबत मी अपील, अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. निश्चितपणे अपीलार्थीनी सुनावणी दरम्यान त्यांच्या नामनिर्देशन पत्रातील झालेली चुक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दुरूस्त करण्याकरीता किंवा राहिलेली त्रुटी दुर करण्याची संधी देण्याकरीता विनंती केली म्हणजेच निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी नमुद केल्याप्रमाणे अपीलार्थीनी नामनिर्देशन पत्र भरतांना त्यांचा समावेश विद्यापीठ अधिनियमातील कलम २८(२)(न) मध्ये होतो अथवा नाही याबाबत काहीही नमुद केलेले नाही. विद्यापीठ प्रशासनाने विहीत केलेल्या नामनिर्देशन पत्रातील सर्व माहिती अचुकपणे भरण्याची जबाबदारी प्रत्येक उमेदवारावर आहे आणि सदर माहिती अत्यंत काळजीपुर्वक भरण्याचे गरजेचे आहे परंतु असे असले तरी अपीलार्थीनी त्यांचे नामनिर्देशन पत्र भरतांना सर्व माहिती त्यात अचुकपणे भरलेली दिसुन येत नाही. सदर नामनिर्देशन पत्र अपुर्ण स्वरुपात असल्याचे दिसते. सदर बाब अपीलार्थी यांनी सुनावणी दरम्यान मान्य व कबुल केली आहे.<br>अपीलार्थीनी सुनावणी दरम्यान मा.मुंबई उच्च न्यायालयाचे वरील नमुद प्रकरणातील न्यायनिर्णय सादर करुन त्यातील गुणोत्तरानुसार त्यांचे अपील मंजुर करावे अशी विनंती केली आहे. मा.मुंबई उच्च न्यायालयाचे सदर न्यायनिर्णय मी आदरपुर्वक वाचला सदर आदेशातील व प्रस्तुत अपीलातील परिस्थिती भिन्न असल्याचे मला प्रथमदर्शनी दिसुन आले. सदर न्यायनिर्णयात नमुद केल्याप्रमाणे याचीकाकर्त्यांनी त्यांच्या नामनिर्देशन पत्रात नमुद केलेल्या दहा सुचकांपैकी सुचक क्रमांक दहाचा मतदार यादीतील अनुक्रमांक १०९ ऐवजी २५२ असा लिहीला होता आणि म्हणुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी याचीकाकर्त्यांचा अर्ज अवैध ठरविला होता. मा.उच्च न्यायालयाने याबाबत निर्णय देतांना सदर निवडणुकीकरीता निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांसाठी असलेल्या मार्गदर्शक पुस्तीकेतील ९.४ व भारतीय प्रतिनिधीत्व कायद्यामधील कलम ३३(४) चा आधार घेवुन सदर बाब लक्षणीय नसल्याचे नमुद केले व याचीका मंजुर करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द केला आहे. वर नमुद केल्याप्रमाणे याचीकेतील निर्णय देतांना मा.उच्च न्यायालयाने त्या नामनिर्देशन पत्रातील त्रुटी लक्षणीय नसल्याचे लक्षात घेवुन याचीकाकर्त्यांच्या हक्कात आदेश पारीत केले आहेत. त्या प्रकरणातील परिस्थिती अपीलार्थीच्या प्रस्तुत प्रकरणाशी जुळत नसल्याचे माझे मत आहे. महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(न) व त्याचे परंतुक पाहिले असता विद्यापीठाच्या अधिसभेकरीता निवडुन द्यावयाचे दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्यांच्या निवडणुकीकरीता उभा राहणाऱ्या उमेदवारांना त्यांचा समावेश कलम २८(२)(न) मध्ये होतो अथवा नाही हे नमुद करणे आवश्यक आहे. सदर माहिती देण्याची काळजी नामनिर्देशन पत्र वैध ठरलेल्या उमेदवारांनी अचुकपणे घेतलेली दिसुन येते त्यामुळे अपीलार्थीच्या हद्दीपावेतो सदर बाब केवळ तांत्रीक किंवा अलक्षणीय ठरवुन त्यांचा अर्ज वैध ठरविता येणार नाही अशी माझी धारणा झाली आहे.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| २ | २/२०२२ | भवर मिनाक्षी श्रीधर | अपीलार्थी भवर मिनाक्षी श्रीधर सुनावणीस स्वतः प्रतिनिधीसह उपस्थित आहेत. अपीलार्थीनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. सदर नामनिर्देशन पत्र निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी नोंदणीकृत मतदार यादीमध्ये त्यांचे नाव आढळुन येत नसल्याने अवैध ठरविले आहे. सदर निर्णयाच्या नाराजीने प्रस्तुत अपील सादर करण्यात आले. अपीलार्थीनी सुनावणी दरम्यान असे नमुद केले की, नोंदणीकृत मतदार यादी तयार करतांना त्यांच्या नावाची नोंद शिंदे मिनाक्षी प्रल्हादराव अशी झालेली असुन सदर नाव त्यांचे लग्नापुर्वीचे असुन आता त्यांना लग्नानंतरचे नाव भवर मिनाक्षी श्रीधर यानावाने निवडणुक लढवायची आहे. दोन भिन्न नावे जरी असली तरी यातील व्यक्ती एकच असुन त्या महिला असल्याने त्यांचे लग्नापुर्वीचे व लग्नानंतरचे दोन्ही नावे लक्षात घ्यावी व त्यांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरवावे अशी त्यांनी विनंती केली. याबाबत मी प्रस्तुत अपील, त्यातील मुद्दे व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेखे पाहिले. मतदारांची नोंदणी करतांना महिलांकरीता लग्नापुर्वीचे व लग्नानंतरचे दोन्ही नावे हमीपत्रासह मतदार यादीत नोंदणी करण्याची मुभा देण्यात आली होती. परंतु असे असुनही अपीलार्थीनी केवळ शिंदे मिनाक्षी प्रल्हादराव या नावाने मतदार म्हणुन नोंदणी केली आहे व त्याअर्थी आज रोजी पदवीधरांच्या यादीत त्यांच्या लग्नानंतरच्या भवर मिनाक्षी श्रीधर या नावाचा समावेश दिसुन येत नाही. त्याअर्थी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे यात मला काहीही गैर दिसुन येत नाही.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ३ | ३/२०२२ | जाधव मोहन माणीक | अपीलार्थी जाधव मोहन माणीक सुनावणीस स्वतः उपस्थित आहेत. अपीलार्थीनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. परंतु सदर नामनिर्देशन पत्र भरतांना त्यांचा समावेश कलम २८(२) मध्ये होतो अथवा नाही याबाबत माहिती भरलेली / दिलेली नाही आणि त्यामुळे निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी ते नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे. याबाबत अपीलार्थी व त्यांचे प्रतिनिधी यांनी सदर बाब स्वीकारली व पुढे सदर बाब तांत्रीक समजुन त्यांच्या नामनिर्देशन पत्राचा सहानुभुतीपर्वक विचार करावा अशी विनंती करुन अपील मंजूर करावे म्हणुन नमुद केले.<br>याबाबत मी अपील, अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. निश्चितपणे अपीलार्थीनी सुनावणी दरम्यान त्यांच्या नामनिर्देशन पत्रातील झालेली चुक दुरूस्त करण्याकरीता किंवा राहिलेली त्रुटी दुर करण्याची संधी देण्याकरीता विनंती केली म्हणजेच निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी नमुद केल्याप्रमाणे अपीलार्थीनी नामनिर्देशन पत्र भरतांना त्यांचा समावेश विद्यापीठ अधिनियमातील कलम २८(२)(न) मध्ये होतो अथवा नाही याबाबत काहीही नमुद केलेले नाही. विद्यापीठ प्रशासनाने विहीत केलेल्या नामनिर्देशन पत्रातील सर्व माहिती अचुकपणे भरण्याची जबाबदारी प्रत्येक उमेदवारावर आहे आणि सदर माहिती अत्यंत काळजीपुर्वक भरण्याचे गरजेचे आहे परंतु असे असले |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तरी अपीलार्थींनी त्यांचे नामनिर्देशन पत्र भरतांना सर्व माहिती त्यात अचुकपणे भरलेली दिसुन येत नाही. सदर नामनिर्देशन पत्र अपुर्ण स्वरुपात असल्याचे दिसते. सदर बाब अपीलार्थी यांनी सुनावणी दरम्यान मान्य व कबुल केली आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(न) व त्याचे परंतुक पाहिले असता विद्यापीठाच्या अधिसभेकरीता निवडुन द्यावयाचे दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्यांच्या निवडणुकीकरीता उभा राहणाऱ्या उमेदवारांना त्यांचा समावेश कलम २८(२)(न) मध्ये होतो अथवा नाही हे नमुद करणे आवश्यक आहे. सदर माहिती देण्याची काळजी नामनिर्देशन पत्र वैध ठरलेल्या उमेदवारांनी अचुकपणे घेतलेली दिसुन येते त्यामुळे अपीलार्थींच्या हद्दीपावेतो सदर बाब केवळ तांत्रीक किंवा अलक्षणीय ठरवुन त्यांचा अर्ज वैध ठरविता येणार नाही अशी माझी धारणा झाली आहे.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ४ | ४/२०२२ | गुट्टे हनुमंत रघुनाथ | श्री. गुट्टे यांनी ओ.बी.सी., डी.टी(व्ही.जे.)/एन.टी. आणि महिला प्रवर्गासाठीच्या जागेवर दावा करण्यासाठी आवश्यक जातप्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, हे तीनही प्रमाणपत्र किंवा यापैकी एखादे प्रमाणपत्र सादर न केलेल्या सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज अवैध करावेत अशी विनंती केली आहे. मुळातच अपीलार्थीने त्याच्या स्वतःच्या बाबतीत निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी पारीत केलेल्या निर्णयाच्या नाराजीने सदर अपील सादर केलेले नाही त्याअर्थी यास अपील म्हणावे अथवा नाही हा मुद्दा उपस्थित होतो. याशिवाय श्री. गुट्टे यांनी नमुद केलेल्या बाबी ह्या निवडणुक एकरुप परिनियम-१/२०१७ मधील तरतुदींशी विसंगत असल्याचे स्पष्टपणे दिसुन येते. सदर निवडणुक परिनियमांमध्ये ओ.बी.सी., डी.टी(व्ही.जे.)/एन.टी. आणि महिला प्रवर्गासाठीच्या जागेवर दावा करण्यासाठी आवश्यक जातप्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र किंवा अशा प्रकारचे इतर कोणतेही प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तरतुद दिलेली नाही. त्याअर्थी श्री गुट्टे यांनी मांडलेले मुद्दे हे तथ्यहीन असल्याचे माझे मत झाले आहे. करीता मी त्यांची विनंती फेटाळुन लावत आहे. |
| ५ | ५/२०२२ | आडे विजय रामधन | अपीलार्थी आडे विजय रामधन सुनावणीस अनुपस्थित आहेत. अपीलार्थींनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. परंतु सदर नामनिर्देशन पत्र भरतांना त्यांचा समावेश कलम २८(२) मध्ये होतो अथवा नाही याबाबत माहिती भरलेली / दिलेली नाही आणि त्यामुळे निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी ते नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे. याबाबत अपीलार्थी व त्यांचे प्रतिनिधी यांनी सदर बाब स्वीकारली व पुढे सदर बाब तांत्रीक समजुन त्यांच्या नामनिर्देशन पत्राचा सहानुभुतीपर्वक विचार करावा अशी विनंती करुन अपील मंजूर करावे म्हणुन नमुद केले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | यावाबत मी अपील, अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. निश्चितपणे अपीलार्थीनी सुनावणी दरम्यान त्यांच्या नामनिर्देशन पत्रातील झालेली चुक दुरूस्त करण्याकरीता किंवा राहिलेली त्रुटी दुर करण्याची संधी देण्याकरीता विनंती केली म्हणजेच निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी नमुद केल्याप्रमाणे अपीलार्थीनी नामनिर्देशन पत्र भरतांना त्यांचा समावेश विद्यापीठ अधिनियमातील कलम २८(२)(न) मध्ये होतो अथवा नाही याबाबत काहीही नमुद केलेले नाही. विद्यापीठ प्रशासनाने विहीत केलेल्या नामनिर्देशन पत्रातील सर्व माहिती अचुकपणे भरण्याची जबाबदारी प्रत्येक उमेदवारावर आहे आणि सदर माहिती अत्यंत काळजीपुर्वक भरण्याचे गरजेचे आहे परंतु असे असले तरी अपीलार्थीनी त्यांचे नामनिर्देशन पत्र भरतांना सर्व माहिती त्यात अचुकपणे भरलेली दिसुन येत नाही. सदर नामनिर्देशन पत्र अपुर्ण स्वरुपात असल्याचे दिसते. सदर बाब अपीलार्थी यांनी सुनावणी दरम्यान मान्य व कबुल केली आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(न) व त्याचे परंतुक पाहिले असता विद्यापीठाच्या अधिसभेकरीता निवडुन द्यावयाचे दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्यांच्या निवडणुकीकरीता उभा राहणाऱ्या उमेदवारांना त्यांचा समावेश कलम २८(२)(न) मध्ये होतो अथवा नाही हे नमुद करणे आवश्यक आहे. सदर माहिती देण्याची काळजी नामनिर्देशन पत्र वैध ठरलेल्या उमेदवारांनी अचुकपणे घेतलेली दिसुन येते त्यामुळे अपीलार्थीच्या हद्दीपावेतो सदर बाब केवळ तांत्रीक किंवा अलक्षणीय ठरवुन त्यांचा अर्ज वैध ठरविता येणार नाही अशी माझी धारणा झाली आहे.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ६ | ६/२०२२ | बडे ओम बाबासाहेब | अपीलार्थी बडे ओम बाबासाहेब सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांच्यावतीने श्री. तिडके यांनी बाजू मांडली. अपीलार्थीनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. परंतु सदर नामनिर्देशन पत्र भरतांना त्यावर त्यांनी स्वत:ची सही केलेली नाही आणि त्यामुळे निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी ते नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे. याबाबत अपीलार्थीचे प्रतिनिधी यांनी सदर बाब स्वीकारली व पुढे सदर बाब तांत्रीक समजुन त्यांच्या नामनिर्देशन पत्राचा सहानुभुतीपर्वक विचार करावा अशी विनंती करुन अपील मंजूर करावे म्हणुन नमुद केले. याबाबत मी अपील व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख पाहिले असता निश्चितपणे अपीलार्थीने त्याच्या नामनिर्देशन पत्रावर स्वता:ची स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे सदर नामनिर्देशन पत्र हे अपुर्ण असुन ते कोणत्याही परिस्थितीत स्वीकारता येणार नाही अशी माझी धारणा झाली आहे.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | ७/२०२२ | बेग ऐजाज साहेब | अपीलार्थी बेग ऐजाज साहेब सुनावणीस उपस्थित आहेत. अपीलार्थींनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. सदर नामनिर्देशन पत्र भरतांना अनुमोदक म्हणुन श्री. दिपक बहीर यांचे नाव नमुद केले आहे परंतु सदर नाव हे पदवीधरांच्या मतदार यादीमध्येच नमुद नाही आणि त्यामुळे निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी ते नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे. याबाबत अपीलार्थींनी सदर बाब स्वीकारली व पुढे सदर बाब तांत्रीक समजुन त्या नावाऐवजी श्री. डीगंबर राधाकिसन यांचे नाव अनुमोदक म्हणुन स्वीकारण्याची विनंती केली व पुढे त्यांच्या नामनिर्देशन पत्राचा सहानुभुतीपर्वक विचार करावा अशी विनंती करुन अपील मंजूर करावे म्हणुन नमुद केले. याबाबत मी अपील व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख पाहिले असता निश्चितपणे अपीलार्थीने त्याच्या नामनिर्देशन पत्रावर मतदार यादीमध्ये नाव नसलेलया व्यक्तीचे नाव अनुमोदक म्हणुन नमुद केले आहे. सदर बाब निश्चितपणे चुकीची असुन त्याअर्थी अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र अपुर्ण असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ८ | ८/२०२२ | कुटे पंकज एकनाथ | अपीलार्थी कुटे पंकज एकनाथ सुनावणीस अनुपस्थित आहेत. अपीलार्थींनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. सदर नामनिर्देशन पत्र भरतांना अंतीम मतदार यादीतील त्यांचा मतदार क्रमांक ए-३०३९ ऐवजी ए-३०३६ असा लिहिला आहे आणि त्यामुळे निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी ते नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे. सदर बाब तांत्रिक व नजरचुकीने झालेली समजुन माझे नामनिर्देशन पत्र वैध ठरवावे अशी विनंती अपीलार्थीने केली आहे.<br>याबाबत मी अपील व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख पाहिले असता निश्चितपणे अपीलार्थीने नामनिर्देशन पत्र भरत असतांना मतदार यादीतील त्याचा क्रमांक ए-३०३९ ऐवजी ए-३०३६ असा लिहिला आहे आणि त्यामुळे अपीलार्थीचे नाव मतदार यादीतील क्रमांकाशी जुळून येत नाही करीता अपीलार्थीच्या नामनिर्देशन पत्राच्या अनुषंगाने निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी घेतलेला निर्णय योग्य असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ९ | ९/२०२२ | गुट्टे हनुमंत रघुनाथ | श्री. गुट्टे यांनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता खुल्या प्रवर्गातुन दोन नामनिर्देशन पत्रे दाखल केली असुन उमेदवारांच्या अंतीम यादीमध्ये त्यांचे नाव दोन वेळा नमुद असावे अशी विनंती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यांनी केली आहे. श्री. गुट्टे यांची विनंती प्रथम दर्शनी मला निवडणुक एकरुप परिनियम-१/२०१७ मधील तरतुदींशी विसंगत असल्याचे दिसुन येते याशिवाय श्री. गुट्टे यांनी सुनावणी दरम्यान त्यांच्या दोन नामनिर्देशन पत्रापैकी एक नामनिर्देशन पत्र विहीत मुदतीपुर्वी ते मागे घेणार असल्याचे नमुद केले. त्याअर्थी श्री. गुट्टे यांच्या अर्जातील विनंती मान्य करता येत नसल्याने मी खारीज करीत आहे. |
| १० | १०/२०२२ | वाघमारे प्रकाश नामदेव | अपीलार्थी वाघमारे प्रकाश नामदेव सुनावणीस उपस्थित आहेत. अपीलार्थींनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. सदर नामनिर्देशन पत्र भरतांना सुचक म्हणुन श्री. राजेश वसंतराव देशमुख व अनुमोदक म्हणुन श्री. निवृत्ती सुधाकर दाभाडे यांचे नाव नमुद केले आहे परंतु सदर सुचक व अनुमोदकांच्या स्वाक्षरी करतांना सदर स्वाक्षरीखाली त्यांनी दिनांक नमुद केलेली नाही आणि त्यामुळे निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी ते नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे. याबाबत मी अपील व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख पाहिले असता निश्चितपणे अपीलार्थीने त्याच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक व अनुमोदकांच्या स्वाक्षरीखाली दिनांक नमुद केलेली नाही. सदर बाब निश्चितपणे चुकीची असुन त्याअर्थी अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र अपुर्ण असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ११ | ११/२०२२ | मोहम्मद अजरउद्दीन मोहम्मद सलीम | अपीलार्थी मोहम्मद अजरउद्दीन मोहम्मद सलीम सुनावणीस स्वतः उपस्थित आहेत. अपीलार्थींनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) प्रमाणे अधिसभेकरीता दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्याकरीताच्या निवडणुकी करीता नामनिर्देशन पत्र सादर केले आहे. परंतु सदर नामनिर्देशन पत्र भरतांना त्यांचा समावेश कलम २८(२) मध्ये होतो अथवा नाही याबाबत स्पष्टपणे नमुद केलेले नाही याकारणास्तव निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी ते नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले आहे.<br>याबाबत मी अपील, अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले परंतु अपीलार्थींनी नामनिर्देशन पत्रात त्यांचा समावेश महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२) मध्ये होत नाही असे स्पष्टपणे नमुद केलेले दिसुन येते. त्याअर्थी नमुद कारणास्तव अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरविणे अयोग्य असल्याचे दिसुन येते.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील मंजुर करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करीत आहे. मी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास याद्वारे आदेशीत करतो की, त्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र वैध समजुन त्यांच्या नावाचा समावेश उमेदवारांच्या अंतीम यादीमध्ये करावा.** |
| १२ | १२/२०२२ | कांबळे शिरीष मिलींदराव | श्री. कांबळे यांनी दाखल केलेले अपील मी पाहिले. मुळातच अपीलार्थीने त्याच्या स्वतःच्या बाबतीत निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी पारीत केलेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | निर्णयाच्या नाराजीने सदर अपील सादर केलेले नाही त्याअर्थी यास अपील म्हणावे अथवा नाही हा मुद्दा उपस्थित होतो. अपीलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्यांआधारे त्यांनी श्री. शेख जहुर खालीद यांचा उमेदवारी अर्ज अवैध करुन त्यांना अपात्र घोषित करावे अशी विनंती केली आहे. अपीलार्थींनी नमुद केलेले मुद्दे पाहता त्यांचा श्री. शेख जहुर खालीद यांच्याशी वैयक्तिक वाद असल्याचे दिसुन येते त्यामुळे सदर वैयक्तिक वादाच्या अनुषंगाने श्री. कांबळे यांना आवश्यक वाटल्यास ते विहीत व न्यायीक मार्गाचा अवलंब करुन आवश्यक ती कारवाई श्री. शेख जहुर खालीद यांच्या विरुद्ध करु शकतात. याशिवाय श्री. शेख जहुर खालीद यांचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरवुन त्यांना अपात्र घोषित करण्याकरीता पुरेशी कारणे मला दिसुन येत नाहीत.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव श्री. शिरिष कांबळे यांनी केलेली विनंती फेटाळुन लावत आहे.** |
| १३ | १३/२०२२ | डुकरे गजानन निवृत्ती | श्री. डुकरे गजानन निवृत्ती सुनावणीस स्वतः उपस्थित आहेत. अनुसुचीत जमाती या राखीव संवर्गातुन नोंदणीकृत पदवीधर मतदार संघातुन ज्या उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे अशा उमेदवारांना जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात यावे अशी आशयाची विनंती श्री. डुकरे यांनी केली आहे. मुळातच अपीलार्थीने त्याच्या स्वतःच्या बाबतीत निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी पारीत केलेल्या निर्णयाच्या नाराजीने सदर अपील सादर केलेले नाही त्याअर्थी यास अपील म्हणावे अथवा नाही हा मुद्दा उपस्थित होतो. याशिवाय श्री. डुकरे यांनी नमुद केलेल्या बाबींत राज्य शासनाचे अनेक निर्देश उपलब्ध असुन सदर सर्व निर्देशांचे पालन करुनच विद्यापीठातील विविध प्राधिकरणांच्या निवडणुका होत आहेत. त्याअर्थी श्री डुकरे यांनी मांडलेले मुद्दे हे या ठिकाणी असंबंध असल्याचे माझे मत झाले आहे. करीता मी त्यांची विनंती फेटाळुन लावत आहे. |
| १४ | १४/२०२२ | गजानन सानप | श्री. गजानन सानप सुनाणीस अनुस्थित आहेत, परंतु त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. नागेश गलांडे हजर आहेत. श्री. गजानन सानप यांनी नामनिर्देशनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र तपासूनच उमेदवारी अर्जाची वैधता निश्चित करण्यात यावी अशी विनंती केली आहे. श्री. सानप यांची विनंती अपील प्रकारात ग्राह्य धरता येणार नाही. परंतु त्यांनी मांडलेल्या मुद्याबाबत राज्य शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत त्याप्रमाणेच कार्यवाही केली जाईल. |
| १५ | १५/२०२२ | उबाळे महेश भाऊराव | श्री. उबाळे महेश भाऊराव यांनी 'पदवीधर' गटासाठी खुल्या प्रवर्गातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.<br>असे निदर्शनास आले आहे की, 'व्यवस्थापन प्रतिनिधी' निर्वाचक गणात त्यांनी नावनोंदणी केलेली असून तेथे ते वैध मतदार ठरले आहेत.<br>कलम २८(२) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या व्यक्तीस 'पदवीधर' गणासाठी उमेदवारी दाखल करता येणार नाही अशी नियमात तरतूद आहे.<br>यानुषंगाने श्री. उबाळे यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दि. १०-११-२०२२ रोजी अपिलीय सुनावणीस बोलविण्यात आले होते. परंतु सदरील सुनावणीस ते अनुपस्थित आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कलम २८(२) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या व्यक्तीस 'पदवीधर' गणासाठी उमेदवारी दाखल करता येणार नाही अशी नियमात तरतूद असल्यामुळे श्री. उबाळे महेश यांचा 'पदवीधर' गणासाठी खुल्या प्रवर्गातून उमेदवारी अर्ज रद्द करणे योग्य ठरते.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव श्री. उबाळे महेश यांचा 'पदवीधर' गणासाठी उमेदवारी अर्ज रद्द करण्याचे आदेश पारीत करीत आहे.** |

दिनांक : १०.११.२०२२
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद.

**कुलगुरू तथा**
**निवडणुक अपीलीय अधिकारी**